(137) 38

मेंढ्यांच्या चराईबाबत घेण्यात येत असलेले चराई शुल्क.....

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. एमएफपी-२१९५/प्र.क्र. १०२/फ-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १९ सप्टेंबर, १९९५.

27 SEP 1995

वाचा : १] महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एमएफपी-१३६५/१३२२११/ झेड, दि. २२ डिसेंबर, १९७१,
२] महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र. एमएफपी-१३६४/१३२२११/ वाय, दि. ६ डिसेंबर, १९६८.

शासन निर्णय :

शासनाने वर संदर्भित दि. ६ डिसेंबर, १९६८ च्या शासन निर्णयान्वये वन जमिनीवर मेंढ्यांच्या चराईसाठी वेगळे क्षेत्र निर्धारित करण्यात यावे, तसेच, मेंढ्यांच्या चराईसाठी विशिष्ट दराने शुल्क आकारण्यात यावे असे आदेश काढले आहेत. त्याचप्रमाणे वर संदर्भित शासन निर्णय, दि. २२ डिसेंबर, १९७१ अन्वये प्रत्येक मेंढी ही एक घटक मानून त्यासाठी रु. १/- प्रतिवर्ष असे चराईशुल्क आकारण्यात यावे असे ठरविण्यात आले आहे.

२. वरील आदेशांचे अधिक्रमण करुन शासन आता असे आदेश देत आहे की, वनक्षेत्रात मेंढ्यांच्या चराईसाठी कोणतेही चराई शुल्क यापुढे आकारण्यात येऊ नये. असे असले तरी, मेंढ्यांच्या चराईसाठी सध्या अस्तित्वात असलेली परवाना पद्धत/सध्याची पद्धत चालू राहील.

३. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४५७/९५/व्यय-१०, दि. ७.८.१९९५ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[नि. ह. काकोडकर]
विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग.

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.